# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

desk2@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: 2/एनजीसी/2015/283

दिनांक: 24 FEB 2015

या संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी ,पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम ,स्नेहसंमेलने होत असतात. या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम , स्नेहसंमेलनांमध्ये काही संस्थांमध्ये गैरशैक्षणिक कार्यक्रम होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही संस्थांच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम , स्नेहसंमेलनांमध्ये विद्यार्थ्यांच्या व्यतिरिक्त बाहेरील ऑर्केस्ट्रा,न्यृत्य समूह यांना आमंत्रित करून कार्यक्रम करण्यात येतात.

संस्थेमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव दिला जावा व विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक पातळीचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न सांस्कृतिक कार्यक्रमांतून होणे अपेक्षित आहे. शैक्षणिक संस्थांच्या सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहसंमेलनांमध्ये आयोजित केले जाणारे कार्यक्रम हे अभिजात दर्जाचे असावेत या दृष्टीकोनातून कळविण्यात येते की, संस्थांमध्ये आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करून त्या समितीकडून मंजूर करून मगच प्रदर्शित व्हावेत. या कार्यक्रमांमधून भारतीय संस्कृतीचा अभिजात दर्जा व सुसंस्कृतता यांचे प्रदर्शन व्हावे जेणेकरून विद्यार्थ्यांचे संस्कृतीसंवर्धन होईल हा उद्देश ठेवून समितीने सादर होणा-या कार्यक्रमास मंजूरी दयावी. कोणत्याही परिस्थितीत संस्थांमधील आयोजित कार्यक्रमांत हिंसेला प्रोत्साहन देणारे,अश्लिलता असलेले ,अभिरूचीहिन कार्यक्रम प्रदर्शित होणार नाहीत याची काळजी प्राचार्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घ्यावी.

संस्थेच्या कार्यक्रमांमध्ये वरील सुचनांचे पालन न करता कार्यक्रम सादर झाल्यास त्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्य आणि व्यवस्थापन मंडळास जबाबदार धरून गंभीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

क्र. तशिसं / प्राकाना / शैवि—३ / जावैप्र / २०१५ / 657

दिनांक : - 4 MAR 2015

प्रति,

प्राचार्य / संचालक

सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था

नागपूर विभाग, नागपूर

सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, परिपत्रकातील सुचनांनुसार कार्यवाही करण्याबाबतची दक्षता घ्यावी.

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर.